# प्रकरण सहावे

प्रकरण सहावे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना

६.२ समस्या विधान

६.२.१ समस्या विधानातील पारिभाषिक संज्ञांचा अर्थ

६.३ संशोधनाची उद्दिष्टे

६.४ परिकल्पना

६.५ संशोधनाची व्याप्ती

६.६ संशोधनाची मर्यादा

६.७ संशोधन पद्धती

६.७.१ प्रायोगिक पद्धती

६.७.२ न्यादर्श

६.७.२.१शिक्षणशास्त्र महाविदयालयाची निवड

६.७.२.२ प्रशिक्षणार्थींची निवड

६.७.३ समान गट अभिकल्प

६.८ माहिती संकलनाची साधने

६.८.१ पारंपरिक पाठ निरीक्षण तक्ता

६.८.२ आशय घटकानुसार पाठ निरीक्षण तक्ता

६.९ संकलित सामुग्रीचे प्रकार

६.१० संकलित सामुग्रीचे विश्लेषण

६.११ संशोधनासंबंधीचे अन्वयार्थ व निष्कर्ष

६.१२ निष्कर्ष

६.१३ शिफारशी

६.१३.१कल्पना या आशय घटकाच्या पाठांशाच्या संदर्भात शिक्षक प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थीसाठी सूचना

६.१३.२ भावना या आशयघटकाच्या पाठाच्या संदर्भात शिक्षक, प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थीसाठी सूचना

६.१३.३ विचार या आशयघटकाच्या पाठ्यांशाच्या संदर्भात शिक्षक प्रशिक्षक-प्रशिक्षणार्थीसाठी सूचना

६.१४ भविष्यकालीन संशोधनासाठी विषय

६.१५ समारोप

प्रकरण सहावे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## ६.१ प्रस्तावना

अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शिक्षक, विदयार्थी हे दोन महत्त्वाचे घटक आहेत तर दोहोंमधला पाठ्यांश हा दुवा आहे. आजच्या रुंद पारंपरिक अध्यापन पद्धतीमध्ये वर्गात विद्यार्थ्यांना सर्वांगीण ज्ञान देण्याऐवजी परीक्षा डोळ्यासमोर ठेवून अध्यापन केले जाते. परिणामी अभ्यासक्रमांची उद्दिष्टे बाजूला राहतात. त्यामुळे शिक्षकाच्या अध्यापनाला मर्यादा पडतात. तर विद्यार्थ्यांच्या संर्वागीण विकासाला अडथळा निर्माण होतो.

मराठी विषयामध्ये वर्गात अध्यापन करताना बरेच शिक्षक पाठ्यघटकाचे गद्य, पद्यांचे अर्थ सांगतात. त्यामुळे ज्या उद्दिष्टांसाठी भाषेमध्ये हे घटक निवडले जातात. ती उद्दिष्टे बाजूलाच पडतात. परिणामी शिक्षकाचे अध्यापन खालच्या पातळीवर तर विद्यार्थी ज्ञान पातळीवर खुजे बनत असताना दिसत आहेत.

आशयघटकानुसार पाठनियोजन करुन अध्यापनाचा आपण इथे विचार करीत आहोत. अध्यापनविषयक दृष्टिकोनात मूलभूत स्वरुपाचा बदल घडविणारी आहे. त्याचबरोबर विषयातील आशयघटकांचे विश्लेषण करण्याची कुवत शिक्षकांच्या अंगी येईल त्यातील आशयघटक कल्पना, भावना, विचार इत्यादी त्यांना समजतील. त्यासाठी त्यांना पाठ नियोजन करता येईल. तसेच आवश्यक सामान्यज्ञान, अधिक ज्ञान तसेच उच्च ज्ञान कोणते द्यावे याचा विचार त्यांना करता येईल. प्रत्येक घटकाचा ते खोलवर विचार करुन त्याचा संबंध घटकांशी जोडू शकतील. यामुळे मातृभाषा अध्ययन अध्यापनाची ध्येये व उद्दिष्टे साध्य होतील.

शिक्षक प्रशिक्षणार्थी वर्गात अध्यापन करताना प्रकट वाचन, हेतुप्रश्न, नवीन शब्द, वाक्प्रचार, मूल्यमापनाचे प्रश्न यापुरतेच मर्यादित राहतात. ते पाठ्यांशातील कल्पना,

भावना, विचार, मत इत्यादी आशय घटकापर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात अडथळा निर्माण होतो आणि शिक्षक प्रशिक्षणार्थी त्याबाबतीत अनभिज्ञ राहतो म्हणून प्रस्तुत संशोधनाचे अर्थनिर्वचन व निष्कर्ष हे आशयघटकानुसार वर्गांतर्गत अध्यापनासाठी शिक्षक प्रशिक्षणार्थींना उपयोगी पडतील

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे आशयघटकानुसार पाठ नियोजन करुन व वर्गांतर्गत अध्यापनासाठी उपयुक्त ठरणारे आहेत म्हणून संशोधकाने ही समस्या हाती घेतली.

## ६.२ समस्या विधान

'मराठी विषयामध्ये आशयघटकानुसार पाठनियोजनाचा शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या वर्गांतर्गत अध्यापनावर होणारा परिणाम - एक अभ्यास'

### ६.२.१ समस्या विधानातील पारिभाषिक संज्ञांचा अर्थ

#### मराठी विषय

**कार्यात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे १९९३ यांनी तयार केलेले इयत्ता आठवीचे 'बालभारती' हे पाठ्यपुस्तक म्हणजे मराठी विषय होय.

#### आशय घटक

**कार्यात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे १९९३ यांनी तयार केलेल्या इयत्ता आठवीच्या 'बालभारती' पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठ्यांशाचे आशयानुसार कल्पना, भावना व विचार याप्रमाणे विभाजन म्हणजे आशय घटक होय.

## कल्पना

### कार्यात्मक व्याख्या

पाठ्यांशातील विविध घटना अथवा प्रसंगाने निर्माण होणाऱ्या प्रतिमांचे विश्लेषण, संश्लेषनातून नवीन कल्पनेची निर्मिती अथवा कल्पनांची मालिका तयार होणे म्हणजे कल्पना'

## भावना

### कार्यात्मक व्याख्या

पाठ्याशांच्या लेखनकर्त्याला जीवनात आलेल्या अनुभवांचा अर्थबोध होऊन विशेष अशी तयार होणारी मनोरचना, तिचे आकलन, अर्थबोध होणे म्हणजे भावना होय.

## विचार

### कार्यात्मक व्याख्या

पाठ्यांशातील घटना किंवा प्रसंगातून व्यक्त झालेली समस्या, अडचण सोडविण्यासाठी तिच्या संबंधीचे विश्लेषण व संश्लेषण, त्यावरचे उपाय म्हणजे विचार होय.

## पाठनियोजन

## कार्यात्मक व्याख्या

### पाठनियोजन (प्रायोगिक गटासाठी )

पाठनियोजन अध्यापन करण्यापूर्वी उद्दिष्टे, स्पष्टीकरणे, प्रस्तावना, हेतुकथन, विषय प्रतिपादन संकलन, उपयोजन, मूल्यमापन व स्वाध्याय इत्यादी अध्यापनकृतींमधून कल्पना, भावना व विचार या आशय घटकानुसार तयार करण्यात आलेला लेखी स्वरुपातील आराखडा होय.

### पाठनियोजन (नियंत्रित गटासाठी)

पाठनियोजन म्हणजे अध्यापन करण्यापूर्वी उद्दिष्टे, स्पष्टीकरणे, प्रस्तावना, हेतुकथन, विषय प्रतिपादन, संकलन, उपयोजन, मूल्यमापन व स्वाध्याय इत्यादी अध्यापन कृतीविषयक तयार केलेला लेखी स्वरुपातील आराखडा होय.

## शिक्षक प्रशिक्षणार्थी

### कार्यात्मक व्याख्या

शिक्षक प्रशिक्षणार्थी म्हणजे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर , महाराष्ट्र यास संलग्नित असणाऱ्या कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी येथे द्वितीय वर्ष एकात्मिक बी.ए.बी.एड् मध्ये सन २००५-०६ मध्ये अध्यापन कसे करावे याबाबत अध्ययन करीत असणारे मराठी अध्यापन पद्धतीचे सर्व प्रशिक्षणार्थी होय.

## अध्यापन

### कार्यात्मक व्याख्या

शिवाजी विदयापीठ कोल्हापूर, महाराष्ट्र यास संलग्नित असणाऱ्या कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी येथे द्वितीय वर्ष एकात्मिक बी.ए.बी.एड् मध्ये सन २००५-०६ मधील सर्व मराठी अध्यापन पद्धतीच्या शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांनी इयत्ता आठवी च्या वर्गात केलेले मराठी विषयाच्या पाठ्यांशाचे अध्यापन होय.

## ६.३ संशोधनाची उद्दिष्टे

या संशोधनाची खालील उद्दिष्टे आहेत.

१) इयत्ता आठवी च्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकातील आशयघटक, कल्पना, भावना व विचार यानुसार पाठ निश्चित करणे.

२) नियंत्रित गटातील प्रशिक्षणार्थींना पारंपरिक (हर्बार्ट पंचपदी) पद्धतीने पाठनियोजनासाठी मार्गदर्शन करणे

३) पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पाठाचे निरीक्षण करणे. यासाठी शिवाजी विद्यापीठाचा १८ मुद्दयांचा पाठ निरीक्षण तक्ता व आशयघटक कल्पना, भावना व विचार पाठ निरीक्षण तक्ता वापरणे.

४) प्रायोगिक गटातील प्रशिक्षणार्थींना कल्पना या आशयघटकानुसार पाठ नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

५) कल्पना या आशय घटकानुसार होणाऱ्या अध्यापनाचे १८ मुद्दयांचा तक्ता व आशय-घटक कल्पनेचा पाठ निरीक्षण तक्ता यानुसार निरीक्षण करणे.

६) प्रायोगिक गटातील प्रशिक्षणार्थींना भावना या आशयघटकानुसार पाठ नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

७) भावना या आशयघटकानुसार होणाऱ्या अध्यापनाचे १८ मुद्दयांचा तक्ता व आशय घटक भावना पाठ निरीक्षण तक्ता यानुसार निरीक्षण करणे

८) प्रायोगिक गटातील प्रशिक्षणार्थ्यांना विचार या आशयघटकानुसार पाठ नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

९) विचार या आशयघटकानुसार होणाऱ्या अध्यापनाचे १८ मुद्दयांचा निरीक्षण तक्ता व आशयघटक विचार पाठ निरीक्षण तक्ता यानुसार निरीक्षण करणे.

१०) कल्पना या आशयघटकानुसार होणाऱ्या पाठाचे अध्यापन व पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पाठाचे अध्यापन यांची तुलना करणे व अध्यापन प्रभावी होण्यासाठी सूचना देणे.

११) भावना या आशयघटकानुसार होणाऱ्या पाठाचे अध्यापन व पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पाठाचे अध्यापन यांची तुलना करणे व अध्यापन प्रभावी होण्यासाठी सूचना देणे.

...AR LIBRARY
...IVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

१२) विचार या आशयघटकानुसार होणाऱ्या पाठाचे अध्यापन व पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पाठाचे अध्यापन यांची तुलना करणे व अध्यापन प्रभावी होण्यासाठी सूचना देणे.

## ६.४ परिकल्पना

संबंधित समस्येसंबंधी परिकल्पना पुढीलप्रमाणे

१) पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा कल्पना या आशय-घटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनात फरक पडतो.

२) पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा भावना या आशय-घटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनात फरक पडतो.

३) पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा विचार या आशय-घटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनात फरक पडतो.

वरील संशोधनासंबंधी खालील शून्य परिकल्पना मांडता येतील.

१) पारंपरिक पद्धतीने केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात व कल्पना या आशय-घटकानुसार केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात काहीही फरक पडत नाही.

२) पारंपरिक पद्धतीने केलेल्या पाठनियोजनानुसारच्या अध्यापनात व भावना या आशय-घटकानुसार केलेल्या पाठनियोजनानुसार अध्यापनात काहीही फरक पडत नाही.

३) पारंपरिक पद्धतीने केलेल्या पाठनियोजनानुसार अध्यापनात व विचार या आशय-घटकानुसार केलेल्या पाठनियोजनानुसार अध्यापनात काहीही फरक पडत नाही.

## ६.५ संशोधनाची व्याप्ती

१) प्रस्तुत संशोधनामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत असणाऱ्या एकात्मिक बी.ए.बी.एड्. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा समावेश होता.

२) त्यातील कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी, जि.कोल्हापूर या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील द्वितीय वर्गातील बी.ए.बी.एड्.प्रशिक्षणार्थींचा समावेश केला.

३) यात सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षातील मराठी प्रथम अध्यापन पद्धती व मराठी द्वितीय अध्यापन पद्धती असणाऱ्या २४ म्हणजे सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थींचा समावेश केला होता.

## ६.६ संशोधनाची मर्यादा

१) सदरच्या संशोधनात शिवाजी विद्यापीठातील एकात्मिक बी.ए.बी.एड्. असणाऱ्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचाच समावेश करण्यात आला होता.

२) द्वितीय वर्ष बी.ए.बी.एड्. मधील मराठी प्रथम अध्यापन पद्धती व मराठी द्वितीय अध्यापन पद्धती असलेल्या २४ म्हणजे सर्व प्रशिक्षणार्थींचा समावेश केला होता.

३) हे संशोधन मराठीतील गद्य व पद्यातील आशयघटक, कल्पना, भावना व विचार यापुरतेचे मर्यादित होते.

४) हे संशोधन इयत्ता आठवीच्या मराठी 'बालभारती' महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (१९९६). या पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित होते.

५) सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षातील कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी जि.कोल्हापूर येथील प्रशिक्षणार्थीपुरतेचे मर्यादित होते.

## ६.७ संशोधन पद्धती ( Design of the study)

### ६.७.१ प्रायोगिक पद्धती

प्रस्तुत संशोधनात पारंपरिक पद्धतीने पाठ नियोजन करुन अध्यापन केल्यास व आशयघटकानुसार पाठ नियोजन करुन अध्यापन केल्यास शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या अध्यापनात कोणता फरक पडतो. त्याचप्रमाणे कोणत्या पद्धतीने अध्यापन प्रभावी ठरते हे पाहण्यासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर करण्यात आला.

यासाठी कार्यात्मक अभिकल्पातील (Functional Design) समान गट अभिकल्प संशोधनासाठी वापरला.

### ६.७.२ न्यादर्श

समान गट अभिकल्प राबविण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धती अवलंबली.

### ६.७.२.१ शिक्षणशास्त्र महाविदयालयाची निवड

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित एकात्मिक बी.ए.बी.एड. चा कोर्स ज्या दोन महाविद्यालयात चालविला जातो त्यापैकी एक महाविद्यालय कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी, जि.कोल्हापूर हे असंभाव्यता पद्धतीतील सहेतूक नमुना निवड यानुसार निवडण्यात आले.

### ६.७.२.२ प्रशिक्षणार्थींची निवड

निवडलेल्या महाविद्यालयातील द्वितीय वर्ष बी.ए.बी.एड् चे प्रशिक्षणार्थी संशोधनाचा विषय म्हणून निवडण्यात आले. यातील प्रथम व द्वितीय मराठी अध्यापन पद्धती असणारे सर्व प्रशिक्षणार्थी संशोधनाचा न्यादर्श होते.

प्रशिक्षणार्थींना एकात्मिक बी.ए.बी.एड्. मध्ये दुसऱ्या वर्षीपासून सराव पाठ घ्यावे लागतात. म्हणून या वर्षाचे प्रशिक्षणार्थी निवडले. यातून दोन गट प्रायोगिक गट (अ) व नियंत्रित गट (ब) निवडले होते. यासाठी विदयार्थ्यांच्या इयत्ता १२ वी तील मराठी विषयातील गुणांवरुन संभाव्यता पद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने प्रशिक्षणार्थींची दोन्ही गटात विभागणी केली. तसेच ही विभागणी करताना प्रायोगिक गट 'अ' मध्ये मराठी प्रथम अध्यापन पद्धती असणारे आठ विद्यार्थी निवडले व मराठी द्वितीय अध्यापन पद्धती असणारे चार विद्यार्थी निवडले.

नियंत्रित गट 'ब' मध्ये मराठी प्रथम अध्यापन पद्धती असणारे आठ विद्यार्थी व मराठी द्वितीय अध्यापन पद्धती असणारे चार विद्यार्थी यापमाणे विभाजन केले होते.

### ६.७.३ समान गट अभिकल्प (Equivalent Group Design)

अन्य सर्व बाबतीत समानता राखून निवडलेल्या दोन गटांवर दोन उपायांचा अवलंब करुन त्यांच्या सापेक्ष परिणामांची तुलना करण्याकरिता समान गट अभिकल्प अधिक योग्य आहे.

प्रस्तुत संशोधनात पारंपरिक पद्धतीने पाठ नियोजन करुन अध्यापन केल्यास तसेच आशयघटकानुसार पाठनियोजन करुन अध्यापन केल्यास शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या अध्यापनाच्या मूल्यांकनात कोणता फरक पडतो हे पाहणे हा संशोधनाचा हेतू होता.

यासाठी प्रायोगिक पद्धत वापरण्यात आली. यासाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्नित असणारे एकात्मिक बी.ए.बी.एड् शिक्षणशास्त्र महाविद्यालय निवडले. अशा दोन महाविद्यालयांपैकी कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी सहेतुकपणे संशोधनासाठी निवडले. एकात्मिक बी.ए.बी.एड् द्वितीय वर्षाचे मराठी प्रथम अध्यापन पद्धती व मराठी द्वितीय अध्यापन पद्धतीच्या एकूण २४ विद्यार्थ्यांचा न्यादर्शात समावेश केला.

संशोधनासाठी समान गट अभिकल्प (यादृच्छिक पद्धती) वापरला. गट 'अ' हा प्रायोगिक होता तर 'ब'गट नियंत्रित होता.

या विद्यार्थ्यांच्या इयत्ता १२ वी तील मराठी विषयातील गुणांवरुन दोन्ही गटात त्यांची विभागणी करण्यात आली होती.

प्रायोगिक गटाला आशयघटकानुसार पाठनियोजनासाठी मार्गदर्शन करुन त्यांचे पाठनिरीक्षण हे शिवाजी विद्यापीठाने तयार केलेला १८ मुद्दयांचा पाठ निरीक्षण तक्ता तसेच आशयघटक पाठ निरीक्षण तक्ता यानुसार केले.

नियंत्रित गटाला पारंपरिक पद्धतीने पाठनियोजनासाठी मार्गदर्शन करुन त्यांचे पाठनिरीक्षण हे शिवाजी विद्यापीठाने तयार केलेल्या १८ मुद्दयांचा पाठ निरीक्षण तक्त्याने व आशयघटक तक्त्याने करण्यात आले होते.

मिळालेल्या माहिती वर्गीकरण करुन दोन्ही गटाचा Mean. S.D.व t, Test वापरुन तुलना केली व फरक काढला. यावरुन अर्थनिर्वचन करण्यात आले. तसेच शिफारशी केल्या.

## ६.८ माहिती संकलनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी खालील साधने वापरली आहेत.

पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन घेण्यात येणाऱ्या पाठांचे व आशय-घटकानुसार नियोजन करुन घेण्यात येणाऱ्या पाठांचे निरीक्षण हे शिवाजी विद्यापीठाचा पाठ निरीक्षण तक्ता व आशयघटकानुसार पाठ निरीक्षण तक्ता यानुसार करण्यात आले.

### ६.८.१ पारंपरिक पाठ निरीक्षण तक्ता

पारंपरीक पद्धतीने पाठनियोजन करुन घेण्यात येणाऱ्या पाठांसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने निश्चित केलेला १८ मुद्दयांचा पाठ निरीक्षण तक्ता वापरण्यात आला तसेच आशयघटक पाठ निरीक्षण तक्ताही वापरलेला होता. (परिशिष्ट-ई)

### ६.८.२ आशय घटकानुसार पाठ निरीक्षण तक्ता

खालील पाठ निरीक्षण तक्ते संशोधकाने संदर्भ ग्रंथांचा व लकाडे सुनिता (२००२/०३) यांच्या निरीक्षण तक्त्यात काही प्रमाणात बदल करुन त्याचा आधार घेऊन तसेच ते तज्ञांकडून प्रमाणित करुन घेतले होते. (परिशिष्ट-उ, ऊ, ए)

### १) 'कल्पना'या आशयघटकानुसार पाठ निरीक्षण तक्ता

आशयघटक कल्पनेनुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनाचे निरीक्षण आशयघटक 'कल्पना' तक्त्याने केले आहे. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाचा १८ मुद्यांचा पाठ निरीक्षण तक्ता यानुसारही पाठ निरीक्षण केले. (परिशिष्ट-उ )

### २) 'भावना'या आशयघटकानुसार पाठ निरीक्षण तक्ता

भावना या आशयघटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनाचे निरीक्षण भावनाचा आशयघटकानुसार पाठ निरीक्षण तक्त्याने केले आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाचा १८ मुद्यांचा पाठ निरीक्षण तक्ता यानुसार निरीक्षण केले. (परिशिष्ट-ऊ)

### ३) 'विचार' या आशयघटकानुसार पाठ निरीक्षण तक्ता

'विचार' आशयघटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनाचे निरीक्षण विचार या आशयघटकानुसार पाठ निरीक्षण तक्त्याने केले आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या १८ मुद्यांचा पाठ निरीक्षण तक्ता यानुसारही निरीक्षण केले आहे. (परिशिष्ट-ए)

## ६.९ संकलित सामुग्रीचे प्रकार

वरील विविध साधनाद्वारे प्रयोगासाठी संकलित केलेल्या आधारसामुग्रीचे प्रकार खालीलप्रमाणे होते.

१) पारंपरिक पाठनिरीक्षण तक्त्याद्वारे संकलित केलेल्या पाठाच्या सामुग्रीची नोंद केली.

२) आशयघटक पाठ निरीक्षण तक्त्याद्वारे संकलित केलेल्या पाठाच्या सामुग्रीची नोंद केली.

## ६.१० संकलित सामुग्रीचे विश्लेषण

पाट निरीक्षण तक्त्याचे मूल्यांकन, आशयघटकानुसार पाठ निरीक्षण तक्त्याचे मूल्यांकन यांचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन तसेच t परिक्षिका वापरण्यात आली.

## ६.११ संशोधनासंबंधीचे अन्वयार्थ व निष्कर्ष

पारंपरिक पाठ निरीक्षण तक्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी तयार केलेला १८ मुद्यांचा तक्ता तसेच आशयघटकानुसार तयार केलेला पाठ निरीक्षण तक्ता याद्वारे संकलित माहितीचे विश्लेषण करुन अर्थनिर्वचन केले आहे ते पुढीलप्रमाणे

### अन्वयार्थ

१) आशयघटक कल्पनेच्या पाठाचे पारंपरिक पाठ निरीक्षण तक्त्यानुसार आलेल्या मूल्याकनाचे आकडेमोड केलेले t मूल्य तसेच सारणीकृत t मूल्य हे ०.०५ व ०.०१ या दोन्ही विश्वास स्तरावर सार्थक आहे.

२) आशयघटक कल्पनेवर आधारित पाठाचे कल्पना पाठ निरीक्षण तक्त्यानुसार आकडेमोड करुन आलेल्या t मूल्य तसेच सारणीकृत t मूल्य हे ०.०५ व ०.०१ या दोन्ही विश्वास स्तरावर सार्थक आहे.

३) आशयघटक भावनेच्या पाठाचे पारंपरिक पाठ निरीक्षण तक्त्यानुसार आलेल्या मूल्याकनाचे आकडेमोड केलेले t मूल्य तसेच सारणीकृत t मूल्य हे ०.०५ व ०.०१ या दोन्ही विश्वास स्तरावर सार्थक आहे.

४) आशयघटक भावनेच्या आधारित पाठाचे भावना पाठ निरीक्षण तक्त्यानुसार पारंपरिक तसेच प्रायोगिक गटाच्या मुल्यांकनाचे आकडेमोड केलेले t मूल्य तसेच सारणीकृत t मूल्य हे ०.०५ व ०.०१ या दोन्ही विश्वास स्तरावर सार्थक आहे.

५) आशयघटक विचारच्या पाठाचे पारंपरिक पाठ निरीक्षण तक्त्यानुसार आलेल्या मूल्याकनाचे आकडेमोड केलेले t मूल्य तसेच सारणीकृत t मूल्य हे ०.०५ व ०.०१ या दोन्ही विश्वास स्तरावर सार्थक आहे.

६) आशयघटक विचारच्या पाठावर आधारित विचार पाठ निरीक्षण तक्त्यानुसार आलेल्या पारंपरिक तसेच प्रायोगिक गटाच्या मुल्यांकनाचे आकडेमोड केलेले t मूल्य तसेच सारणीकृत t मूल्य हे ०.०५ व ०.०१ या दोन्ही विश्वास स्तरावर सार्थक आहे.

## ६.१२ निष्कर्ष

१) आशयघटक कल्पनेच्या बाबतीत पाठनियोजनासाठी पारंपरिक पद्धतीपेक्षा प्रायोगिक पद्धती अधिक उपयुक्त आहे.

२) आशयघटक कल्पनेच्या पाठाच्या बाबतीत पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा कल्पना या आशयघटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापन अधिक परिणामकारक ठरते.

३) आशयघटक कल्पनेच्या बाबतीत पारंपरिक पद्धतीपेक्षा प्रायोगिक पद्धती अधिक परिणामकारक आहे.

४) आशयघटक भावनेच्या पाठाच्या बाबतीत पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा कल्पना या आशयघटकानुसार पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापन अधिक परिणामकारक ठरते.

५) आशयघटक भावनेनुसारच्या पाठाच्या बाबतीत पारंपरिक पद्धतीपेक्षा प्रायोगिक पद्धती अधिक परिणामकारक आहे.

६) आशयघटक विचारच्या पाठाच्या बाबतीत पाठनियोजनासाठी पारंपरिक पद्धतीपेक्षा प्रायोगिक पद्धती अधिक उपयुक्त आहे.

७) आशयघटक विचाराच्या पाठाच्या बाबतीत पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन करुन केलेल्या अध्यापनापेक्षा विचार या आशय घटकानुसार पाठनियोजन करुन केलेले अध्यापन अधिक परिणामकारक असते.

८) आशयघटक विचारनुसारच्या पाठाच्या बाबतीत पारंपरिक पद्धतीपेक्षा प्रायोगिक पद्धती अधिक परिणामकारक आहे.

## ६.१३ शिफारशी

### ६.१३.१ कल्पना या आशय घटकाच्या पाठांशाच्या संदर्भात शिक्षक प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थीसाठी सूचना

१) शिक्षक प्रशिक्षकांसाठी सूचना

खालील सूचना शिक्षक प्रशिक्षकांसाठी उपयुक्त आहेत.

१) शिक्षक प्रशिक्षकांनी प्रशिक्षणार्थींबरोबर भाषेच्या पाठ्यपुस्तकातील आशयाबाबत चर्चा करुन आशयघटक निश्चित करावेत.

२) आशयघटकानुसार कल्पना या आशयघटकावरील पाठ निश्चित करावेत. प्रशिक्षणार्थींना कल्पना या आशयघटकानुसार पाठ नियोजनासाठी मार्गदर्शन करावे.

३) कल्पना या आशयघटकावरील प्रशिक्षणार्थींना पाठातील मध्यवर्ती कल्पना पाठापूर्वी समजावून दिली पाहिजे.

४) कल्पना या आशयघटकावरील पाठात आलेल्या विविध प्रतिमा यांचे विश्लेषण व संयोजन याविषयी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करावे.

५) कल्पना या आशयघटकावरील विविध प्रतिमांच्या आधारे नवीन कल्पनेच्या निर्मिती संबंधी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करावे.

६) कल्पना या आशयघटकावरील कल्पनेच्या शृंखलेतून लेखकाने त्यातून कोणती गोष्ट व्यक्त केली आहे हे प्रशिक्षणार्थींना सांगावे.

७) कल्पना या आशयघटकातील कल्पनेचे विश्लेषणासाठी योग्य शैक्षणिक साहित्याचा वापर कसा करावा याचे मार्गदर्शन करावे.

८) कल्पना या आशयघटकावरील पाठासाठी योग्य संदर्भ साहित्याच्या वापराविषयी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करावे.

## २) प्रशिक्षणार्थींसाठी सूचना

खालील सूचना प्रशिक्षणार्थींसाठी उपयुक्त आहेत.

१) आशयघटक कल्पनेवरील पाठ घेण्यापूर्वी आपल्या मार्गदर्शकाबरोबर आशयाच्या संदर्भात चर्चा करावी.

२) कल्पना या आशयघटकावरील पाठातील वेगवेगळ्या प्रतिमा क्रमबद्धपणे विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट कराव्यात.

३) कल्पना या आशयघटकावर आधारित पाठातील प्रतिमेचे विश्लेषण एका विशिष्ट दिशेने करावे. त्यात सलगता हवी.

४) कल्पना या आशयघटकावर आधारित पाठातील प्रतिमेचा नेमका अर्थ सांगून प्रतिमेचे संयोजन करावे.

५) कल्पना या आशयघटकावर आधारित पाठातील नवीन कल्पना निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहान दिले जावे.

६) कल्पना या आशयघटकावर आधारित पाठातील लेखकाला जे सांगायचे आहे ते विद्यार्थ्यापर्यंत पोहचवावे.

७) कल्पना या आशयघटकावर आधारित पाठातील स्पष्टीकरणासाठी योग्य शैक्षणिक साहित्याचा वापर करावा.

८) कल्पना या आशयघटकावर आधारित पाठातील कल्पना स्पष्ट करण्यासाठी संदर्भ साहित्याचा वापर करावा.

९) कल्पना या आशयघटकावर आधारित पाठ मार्गदर्शकांच्या सूचनेप्रमाणे पाठ घ्यावा.

## ६.१३.२ भावना या आशयघटकाच्या पाठाच्या संदर्भात शिक्षक, प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थीसाठी सूचना

### १) शिक्षक - प्रशिक्षकांसाठी सूचना

खालील सूचना शिक्षक प्रशिक्षकांसाठी उपयुक्त आहेत.

१) शिक्षक प्रशिक्षकांनी प्रशिक्षणार्थींबरोबर भाषेच्या आशयाबाबत चर्चा करुन आशय घटक निश्चित करावेत.

२) आशयघटकानुसार भावना या आशय घटकांवरील पाठ निश्चित करावेत व प्रशिक्षणार्थींना भावना या आशयघटकानुसार मार्गदर्शन करावे.

३) आशयघटकानुसार भावना या आशय घटकांवरील पाठनियोजनासाठी प्रशिक्षणार्थीला मार्गदर्शन करावे.

४) भावना या आशयघटकांवरील पाठातील परिस्थितीचे आकलनाविषयी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करावे.

५) भावना या आशय घटकांवरील पाठ्यांशातील घटनेतून अथवा प्रसंगातून व्यक्त होणारा भावनेचा अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगावा.

६) भावना या आशयघटकांवरील पाठातील भावना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशिक्षणार्थींनी भावनादर्शी कृती कशी करावी याविषयी मार्गदर्शन करावे.

७) भावना या आशयघटकांवरील पाठातील अनेक भावना व्यक्त करण्यासाठी योग्य अभिनय, आवाजात चढ-उतार केव्हा व कसा करावा याविषयी मार्गदर्शन करावे.

८) भावना या आशयघटकांवरील पाठात विद्यार्थ्यांनाही भावना व्यक्त करण्याची संधी द्यावी. याविषयी प्रशिक्षणार्थीला मार्गदर्शन करावे.

९) भावना या आशयघटकांवरील पाठात इतरांच्या भावना कशा समजावून घ्याव्यात याविषयी प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन करावे.

१०) भावना या आशयघटकांबरील पाठासाठी योग्य शैक्षणिक व संदर्भ साहित्य वापरावे याविषयी मार्गदर्शन करावे.

**२) प्रशिक्षणार्थीसाठी सूचना**

खालील सूचना प्रशिक्षणार्थीसाठी उपयुक्त आहेत.

१) आशयघटक भावना यावरील पाठ घेण्यापूर्वी आपल्या मार्गदर्शकां-बरोबर आशयाच्या संदर्भात चर्चा करावी.

२) आशयघटक भावना यावरील पाठातील परिस्थितीचे आकलन करुन घ्यावे व त्यातील व्यक्त झालेल्या घटनेचा अर्थबोध लावावा. पाठातील घटना किंवा प्रसंगातील भावना विद्यार्थ्यासमोर मांडताना भावदर्शी कृती असावी. व त्यासाठी योग्य अभिनय करावा.

३) आशयघटक भावना यावरील पाठाचे प्रकट वाचन करताना आवाजात योग्य चढ उतार असावा.

४) आशयघटक भावना यावरील पाठाचे वर्गात अध्यापन चालू असताना विद्यार्थ्यांना भावना व्यक्त करण्याची संधी द्यावी. यातून त्यांच्या वैयक्तिक क्षमतांचा विकास होतो.

५) आशयघटक भावना यावरील पाठ घेते वेळी प्रशिक्षणार्थीनी विद्यार्थ्यांना इतरांच्या भावनांचा आदर करावा हे शिकवावे.

६) आशयघटक भावना यावरील पाठातील भावना नीट समजण्यासाठी योग्य शैक्षणिक साधनांचा वापर करावा.

७) आशयघटक भावना यावरील पाठातील भावनेच्या स्पष्टीकरणासाठी संदर्भ साहित्याचा वापर करावा.

८) आशयघटक भावना यावरील पाठ मार्गदर्शकांच्या सूचनेप्रमाणे पाठ घ्यावा.

## ६.१३.३ विचार या आशयघटकाच्या पाठ्यांशाच्या संदर्भात शिक्षक प्रशिक्षक-प्रशिक्षणार्थीसाठी सूचना

### १) शिक्षक प्रशिक्षकांसाठी सूचना

खालील सूचना शिक्षक प्रशिक्षकांसाठी उपयुक्त आहेत.

१) शिक्षक प्रशिक्षकाने प्रशिक्षणार्थ्याबरोबर भाषेच्या पाठ्यपुस्तकातील आशयाबाबत चर्चा करुन आशयघटक विचाराचे पाठ निश्चित करावेत.

२) आशयघटकानुसार विचार या आशयघटकावरील पाठ निश्चित करावेत व प्रशिक्षणार्थींना विचार या आशयघटकानुसार पाठ नियोजनासाठी मार्गदर्शन करावे.

३) आशयघटकानुसार विचार या पाठातील लेखकाचे विचार समस्येच्या किंवा माहितीच्या रुपात असू शकतात याची माहिती प्रशिक्षणार्थींना द्यावी.

४) आशयघटकानुसार विचार या पाठातील समस्या, तिचे विश्लेषण याविषयी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करावे.

५) आशयघटकानुसार विचार या पाठातून सांगितलेला मुख्य विचार विद्यार्थ्यांपर्यंत कसा पोहचवावा याविषयी मार्गदर्शन करावे.

६) आशयघटकानुसार विचार या पाठाचे विश्लेषण तसेच संश्लेषणातुन जी समस्या जाणवते त्याविषयी निश्चित उपाय सांगावे. या संदर्भात प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करावे.

७) आशयघटकानुसार विचार या विचाराच्या विश्लेषणासाठी योग्य शैक्षणिक साहित्याचा वापर कसा करावा याचे मार्गदर्शन करावे.

८) आशयघटकानुसार विचार या पाठासाठी योग्य संदर्भ साहित्याच्या वापराविषयी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करावे.

## २) प्रशिक्षणार्थीसाठी सूचना

खालील सूचना प्रशिक्षणार्थीसाठी उपयुक्त आहेत.

१) आशयघटक विचार वरील पाठ घेण्यासाठी आपल्या मार्गदर्शकांबरोबर आशयाच्या संदर्भात चर्चा करावी.

२) आशयघटक विचार वरील पाठ घेण्यासाठी पाठातील समस्येचे अथवा समस्येतील माहितीचे क्रमवार विश्लेषण करावे.

३) आशयघटक विचार वरील पाठ घेताना पाठातील घटनेचे विश्लेषण केले असता नेमका कोणता विचार स्पष्ट होतो हे विद्यार्थ्यांना सांगावे.

४) आशयघटक विचार वरील पाठ घेताना पाठातील समस्येच्या संदर्भात नेमका उपाय व निश्चित उपाय सुचवण्याचा प्रयत्न करावा.

५) आशयघटक विचार वरील पाठ घेताना विचाराच्या विश्लेषणासाठी योग्य शैक्षणिक साहित्याचा वापर करावा.

६) आशयघटक विचार वरील पाठ घेताना पाठासाठी योग्य संदर्भ साहित्याचा वापर करावा.

७) आशयघटक विचार वरील पाठ घेताना मार्गदर्शकाच्या सूचनेप्रमाणे पाठ घ्यावा.

## ६.१४ भविष्यकालीन संशोधनासाठी विषय

१) मराठीशिवाय इतर विषयामध्येही आशयघटकनुसार अध्यापनाचा परिणाम अभ्यासणे.

२) कल्पना, भावना व विचार या शिवाय असणाऱ्या आशयघटकानुसार पाठनियोजन करुन अध्यापनात पडणारा फरक अभ्यासणे.

३) परिणामकारक अध्यापनासाठी पाठासंबंधी उपलब्ध शैक्षणिक साधनापेक्षा वेगळी शैक्षणिक साधने वापरुन अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.

४) शिक्षणाच्या विविध स्तरावर कोणकोणते संदर्भ साहित्य पाठ अध्यापनासाठी उपयुक्त ठरते हे अभ्यासणे.

५) कल्पना, भावना व विचार या प्रत्येक स्वतंत्र आशयघटकानुसार पाठ नियोजन करुन अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.

६) आशयघटक कल्पना व भावना यानुसार स्वतंत्रपणे पाठनियोजन करुन अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.

७) आशयघटक कल्पना व विचार यानुसार स्वतंत्रपणे पाठनियोजन करुन अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.

८) आशयघटक भावना व विचार यानुसार स्वतंत्रपणे पाठनियोजन करुन अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.

९) पारंपरिक अध्यापनाची सद्यस्थिती व उपाय अभ्यासणे.

## ६.१५ समारोप

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रस्तावना, समस्या विधान, संशोधनाची उद्दिष्टे, परिकल्पना, व्याप्ती, मर्यादा दिली आहे. संशोधनाअंती निघालेले अन्वयार्थ व निष्कर्ष दिले आहेत. याचबरोबर आशयघटकानुसार पाठनियोजन व अध्यापन यासाठी शिक्षक प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी याच्यासाठी सुचना दिल्या आहेत. याशिवाय भविष्यकालीन संशोधनासाठी विषय सुचविले आहेत.